368

ITEM NO.1 :

# MINUTES OF THE 76TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 14th November, 1994 (Monday)

TIME : 4.00 P.M.

PLACE : Committee Room (Room No.415) in the office of the Hon'ble Minister for Urban Development, 4th Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri R.R. Singh, Councillor, Municipal Corporation of Greater Bombay. | - Member |
| Shri Subhash Mayekar, Councillor, Municipal Corporation of Greater Bombay. | - Member |
| Shri Ramesh Dube, M.L.A. | - Member |
| Shri D. Mehta, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

As the quorum was not present the meeting adjourned. As provided under Rule 12 of the BMRDA (Conduct of Business at Meetings) Regulations, 1975, the Meeting was held after half-an-hour i.e. at 4.30 P.M.

-.-.-.-.-.-.-.-

.....2

# MINUTES OF THE ADJOURNED 76TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 14th November, 1994 (Monday)

TIME : 4.30 P.M.

PLACE : Committee Room (Room No.415) in the office of the Hon'ble Minister for Urban Development, 4th Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Arunlal Gujarathi, Minister for Urban Development. | - Chairman |
| Shri Chhagan Bhujbal, Minister for Housing. | - Member |
| Shri R.R. Singh, Councillor, Municipal Corporation of Greater Bombay. | - Member |
| Shri Subhash Mayekar, Councillor, Municipal Corporation of Greater Bombay. | - Member |
| Shri Ramesh Dube, M.L.A. | - Member |
| Shri S.G. Kale, Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Bombay. | - Member |
| Shri D.T. Joseph, Secretary (TPWSS) to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri Ajit Warty, Secretary to Government, Housing & Special Assistance Department. | - Member |
| Shri D. Mehta, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

INVITEE :

Shri Y.L. Rajwade,
Principal Secretary (ULB) to Government,
Urban Development Department.

ITEM NO. 1 : Confirmation of the minutes of the last (75th) Meeting of the Authority held on 20th September, 1994.

The minutes were confirmed.

369



ITEM NO. 2 : Action taken on the minutes of the last (75th) Meeting of the Authority held on 20th September, 1994.

Referring to the action taken report in respect of Item No.3 viz. "Allotment of Commercial Plots in International Finance & Business Centre (IFBC) in G-Block of Bandra-Kurla Complex", the Metropolitan Commissioner informed the meeting that the Executive Committee discussed the proposal regarding calling category-wise tenders for disposal of Commercial Plots in IFBC (vide Annexure to the Item Note) and the Committee suggested that the following sentence be added at the end of Condition No.(4) in paragraph 4 of the said proposal :-

"This condition will not apply to the persons/ institutions/companies who have been leased or agreed to be leased a floor space not exceeding 10,000 sq.ft. in International Finance and Business Centre, subject, however, that total floor space to a single allottee shall not exceed 22,000 sq.mtrs."

The Authority agreed with the suggestion of the Executive Committee and approved the proposal contained in the Annexure by incorporating the said suggestion therein.

The action taken report was then noted by the Authority.

ITEM NO. 3 : Development of a Multistoreyed Car Park and Commercial Plot in the International Finance & Business Centre (IFBC) in G-Block of Bandra-Kurla Complex - scrutiny of tenders.

After some discussion further consideration of the Item was deferred.

ITEM NO. 4 : Allotment of Commercial Plot No.C-21 in 'E' Block of Bandra-Kurla Complex to the Maharashtra Co-operative Housing Finance Society Limited (now changed as The Maharashtra State Co-operative Housing Finance Corporation Limited (Corporation)) - Request for waiving the condition of allotment of 10% of built-up area to the State Government on 10 years' hire purchase.

The Authority noted that the lessee of Commercial Plot No.C-21 in E-Block of Bandra-Kurla Complex (B.K.C.) viz. the Maharashtra Co-operative Housing Finance Society Limited (now changed as The Maharashtra State Co-operative Housing Finance Corporation Limited) has requested for waiving of

.....3/-

the condition stipulating allotment by the lessee to the State Government 10% of the built-up area on the plot on 10 years' hire purchase basis. The Authority also noted the reasons advanced by the said lessee in support of its request which were mentioned in para.3 of the Item Note. The Authority did not agree to waive the condition under reference as the lessee had sufficient built-up space available after meeting its own requirement. The Authority, however, authorised the Metropolitan Commissioner to give extension of time to the lessee for completing the balance work in case the lessee came forward with such a request to the BMRDA within 30 days.

ITEM NO. 5 : Disposal of remaining vacant premises in A1, B1, B2 and D2 buildings at Wadala Truck Terminal.

After discussion, the Authority approved the proposal contained in the Item Note with the condition that the available space be offered to the persons, firms etc. dealing in transport trade in the Island City from ward A to E on a certain cut off date to be decided by the Metropolitan Commissioner. The Metropolitan Commissioner was also authorised to stipulate other relevant conditions for facilitating decongestion from the Island City. The Authority also authorised the Metropolitan Commissioner to request the Municipal Corporation of Greater Bombay to use the space vacated by the traders after their shifting to Truck Terminal in keeping with the policy of decongestion. Accordingly, the Authority passed the following Resolution :-

RESOLUTION NO.622 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby approves the proposal of disposal of all the remaining vacant premises in A1, B1, B2 and D2 buildings at Wadala Truck Terminal by calling for tenders for shops/ offices and godowns from the persons dealing in the transport trade in the Island City from wards A to E in Bombay and who are eligible as per BMRDA's criteria on a certain cut off date as may be fixed by the Metropolitan Commissioner and also for one unit each for Bank, Chemist

shop, dispensary, utility stores (General Store) from the persons/firms engaged in the respective business in Greater Bombay.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to take all further steps to implement the above Resolution including relevant additional conditions for allotment of space."

ITEM NO. 6 : Approval of Lease Deed form to be executed between the Authority and the allottees of built-up premises in Wadala Truck Terminal.

The Authority approved the draft Lease Deed as per Annexure to the Item Note subject to incorporating therein suggestions which would be made by the Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Bombay and accordingly passed the following Resolution :-

RESOLUTION NO.623 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under Section 50, read with sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby approves draft of Lease Deed appended as Annexure to the Item Note, to be executed between the Authority and the allottees of the built-up premises at Wadala Truck Terminal, subject to incorporating therein the suggestions that would be made by the Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Bombay."

ITEM NO. 7 : Development of Convention Centre-cum-Hotel in the International Finance and Business Centre (IFBC) at Bandra-Kurla Complex.

While presenting this Item, the Metropolitan Commissioner informed the meeting that the Executive Committee had discussed this issue and that they had recommended to the Authority (i) to approve the proposal contained in the Item Note; (ii) to authorise the Committee consisting of the Secretary (TPWSS) to Government, Urban Development Department; the Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Bombay and the Metropolitan Commissioner to finalise the draft advertisement enclosed as Annexure-II to the Item Note with suitable amendments to remove any likely legal loopholes; and

.....5/-

(iii) to authorise the Metropolitan Commissioner to invite offers for the project of Convention Centre, Hotel and Service Centre as per the advertisement finalised by the aforementioned Committee.

Agreeing with the recommendation of the Executive Committee, the Authority passed the following Resolution :-

RESOLUTION NO.624 :

"RESOLVED THAT the Authority hereby approves the proposal regarding development of Convention Centre, Hotel and Service Centre as detailed in the Item Note.

"RESOLVED FURTHER THAT in exercise of the powers conferred under Section 9 of the BMRDA Act, 1974, the Authority hereby appoints a Committee consisting of the Secretary (IPWSS) to Government, Urban Development Department; the Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Bombay and the Metropolitan Commissioner, BMRDA to finalise the draft advertisement enclosed as Annexure-II to the Item Note with suitable amendments to remove any legal loopholes.

"RESOLVED FURTHER THAT the Authority hereby authorises the Metropolitan Commissioner to invite offers for the project of Convention Centre, Hotel and Service Centre as per the advertisement finalised by the Committee mentioned in foregoing para."

ITEM NO. 8 : Draft Revised Regional Plan for BMR 1991-2011.

Consideration of the Item was deferred.

ITEM NO. 9 : Area Development Scheme at Pawai, B.S.D. - Writ Petition No.1477 of 1993, filed by Shri Ajay Mohan & Anr. and Notice of Motion No.326 of 1994.

Consideration of the Item was deferred.

ITEM NO.10 : Powai Area Development Scheme.

Consideration of the Item was deferred.

The meeting then concluded with a vote of thanks to the Chair.

-.-.-.-.-.-.-.-.-.-

बाब क्रं. १ 374

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
७८ व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : १४ नोव्हेंबर, १९९४ [सोमवार]

वेळ : संध्याकाळी ४.०० वाजता

सभास्थान : मा. नगर विकास मंत्री यांच्या कार्यालयातील समिती कक्ष [खोली क्र. ४१५] चौथा मजला मंत्रालय.

उपस्थित सदस्य :

श्री. रा. रा. सिंह – सदस्य
नगरसेवक
बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री. सुभाष मयेकर – सदस्य
नगरसेवक
बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री. रमेश दुबे – सदस्य
विधानसभा सदस्य

श्री. देवव्रत मेहता – सदस्य सचिव
महानगर आयुक्त

गणपूर्ती न होऊ शकल्याने बैठक स्थगित झाली.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या [बैठकीचे कामकाज] विनियम, १९७५ मधील नियम १२, खालील तरतुदीनुसार, अर्धा तासानंतर सभा संध्याकाळी ४.३० वाजता घेण्यात आली.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
तहकुब ७८ व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : १५ नोव्हेंबर, १९९४ [सोमवार]

वेळ : सायंकाळी ४.३० वाजता

सभास्थान : मा. नगर विकास मंत्री यांच्या कार्यालयातील समिती कक्ष [खोली क्र. ४१५] चौथा मजला, मंत्रालय.

उपस्थित सदस्य :

श्री. अरुणलाल गुजराथी – अध्यक्ष
नगर विकास मंत्री

श्री. छगन भुजबळ – सदस्य
गृहनिर्माण मंत्री

श्री. रा. रा. सिंह – सदस्य
नगरसेवक,
बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री. सुभाष मयेकर – सदस्य
नगरसेवक,
बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री. रमेश दुबे – सदस्य
विधानसभा सदस्य

श्री. श. गं. काळे – सदस्य
महानगरपालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका

श्री. डी. टी. जोसेफ – सदस्य
शासनाचे सचिव,
[नगररचना व पाणीपुरवठा आणि जलनि:सारण]
नगर विकास विभाग

श्री. अजित वर्टी – सदस्य
शासनाचे सचिव,
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग.

श्री. देवव्रत मेहता – सदस्य सचिव
महानगर आयुक्त

निमंत्रित :

श्री. ध. ल. राजवाडे
शासनाचे प्रधान सचिव, [नागरी स्थानिक संस्था]
नगर विकास विभाग.

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [७४ व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या मागील [७५ व्या] बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही.

"वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यवसाय केंद्रात वाणिज्यिक भूखंड नेमून देणे" या बाब क्र. ३ बाबत केलेल्या कार्यवाही अहवालाच्या संदर्भात महानगर आयुक्त यांनी बैठकीत असे सांगितले की, आंतरराष्ट्रीय वित्त व व्यवसाय केंद्रातील वाणिज्यिक भूखंडाच्या विक्रीसाठी [बाब टिप्पणीच्या जोडपत्रानुसार] वर्गवार निविदा मागविण्यासंबंधातील प्रस्तावावर कार्यकारी समितीने चर्चा केली आणि समितीने उक्त प्रस्तावाच्या परिच्छेद ४ मधील शर्त क्र. [४] च्या शेवटी पुढील वाक्ये जोडण्यात यावीत अशी सूचना केली :-

"आंतरराष्ट्रीय वित्त व्यवसाय केंद्रातील जास्तीत जास्त १०,००० चौ. फूट चटईक्षेत्र ज्या व्यक्तींना/संस्थांना/कंपन्यांना भाडेपट्टयाने देण्यात आले आहे किंवा भाडेपट्टयाने देण्याचे मान्य केले आहे त्यांना ही शर्त लागू होणार नाही. तथापि, एका वाटपप्राप्त व्यक्तीस/संस्थेस/कंपनीस आंतरराष्ट्रीय वित्त व्यवसाय केंद्रात द्यावयाचे एकूण चटईक्षेत्र २२,००० चौ. मीटरहून अधिक असणार नाही."

प्राधिकरणाने कार्यकारी समितीची सूचना मान्य केली आणि जोडपत्रातील प्रस्ताव त्यात उक्त सूचना समाविष्ट करून मान्य करण्यात आला.

त्यानंतर प्राधिकरणाने कार्यवृत्तावरील कार्यवाहीची नोंद घेतली.

बाब क्र.३ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील बहुमजली वाहनतळ व वाणिज्य भूखंड विकसित करणेसाठी मागविण्यात आलेल्या निविदांची छाननी.

थोडी चर्चा केल्यानंतर, या बाबीवरील विचार विमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र.४ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "इ" ब्लॉकमधील वाणिज्य भूखंड क्र.सी-२१ महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण वित्त संस्था मर्यादित [आता नांव बदल होऊन महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्त महामंडळ मर्यादीत [महामंडळ]] यांना नेमून देणे-१० टक्के परिबध्द क्षेत्र १० वर्षांच्या भाडे-खरेदी तत्वावर राज्य शासनास नेमून देण्याची अट माफ करण्याबाबत.

वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "इ" ब्लॉकमधील वाणिज्य भूखंड सी-२१ चा पट्टेदार म्हणजेच महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण वित्त संस्था मर्यादित [आता नांव बदल होऊन महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्त महामंडळ मर्यादित] यांनी या भूखंडावरील १० टक्के परिबध्द क्षेत्र पट्टेदाराने राज्य शासनास १० वर्षांच्या भाडे-खरेदी तत्वावर नेमून देण्याबाबत घातलेली शर्त सोडून देण्याची विनंती केली आहे, याची प्राधिकरणाने नोंद घेतली. बाब टिप्पणीच्या परिच्छेद ३ मध्ये, पट्टेदाराने आपल्या विनंतीच्या समर्थनार्थ नमूद केलेल्या कारणांची देखील प्राधिकरणाने नोंद घेतली. पट्टेदाराकडे आपली आवश्यकता भागविल्यानंतर पुरेसे परिबध्द क्षेत्र उपलब्ध असल्यामुळे प्राधिकरणाने संदर्भाधीन शर्त माफ करण्याचे मान्य केले नाही. तथापि, पट्टेदाराने उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी मुदतवाढीची विनंती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास ३० दिवसांच्या आत केली तर त्याला अशी मुदतवाढ देण्यास प्राधिकरणाने महानगर आयुक्त यांना प्राधिकृत केले आहे.

बाब क्र.५ : वडाळा भारवाहक तळातील ए-१, बी-१, बी-२ व डी-२ या इमारतीतील राहिलेल्या रिक्त गाळ्यांचे वितरण करणे.

चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव प्राधिकरणाने या शर्तीसह मान्य केली की, या बेट शहराच्या अ ते इ या प्रभागांत वाहतूक व्यवसाय करणा-या व्यक्ती, संस्था इत्यादी, यांना महानगर आयुक्त ठरवतील त्या विशिष्ट तारखेस उपलब्ध रिकामी जागा देऊ करण्यात येईल. बेट शहरातील दाटी सुरळीतपणे कमी करण्यासाठी इतर योग्य त्या शर्ती घालण्यासही महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात आले. तसेच हे व्यापारी ट्रक टर्मिनलमध्ये आल्यानंतर

त्यांनी रिकामी केलेली जागा दाटी दूर करण्याच्या धोरणाशी सुसंगत होईल अशा प्रकारे वापरण्यासाठी बृहन्मुंबई महापालिका आयुक्तांना विनंती करण्याचा प्राधिकार महानगर आयुक्तांना देण्यात आला. तद्नुसार प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र ६२२ :

" असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम [२] अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, बेट शहराच्या अ ते इ प्रभागांत वाहतूक व्यवसाय करणा-या आणि महानगर आयुक्त ठरवतील त्या विशिष्ट तारखेस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या निकषानुसार पात्र असलेल्या व्यक्तींकडून दुकाने-कार्यालये आणि गोदामे यासाठी तसेच बँक, औषधीचे दुकान, दवाखाना, सर्ववस्तू भांडार, यासाठी प्रत्येकी एक गाळा बृहन्मुंबईत संबंधित व्यवसाय करणा-या व्यक्ती/संस्थांकडून, निविदा मागवून वडाळा ट्रक टर्मिनल येथील ए-१, बी-१, बी-२ आणि डी-२ या इमारतींमधील उरलेल्या सर्व रिकाम्या जागांच्या विक्रीचा प्रस्ताव मान्य करीत आहे.

" असाही ठराव करण्यात येत आहे की, जागा वाटपांच्या संबंधित वरील ठराव अतिरिक्त शर्तीसह अंमलात आणण्यासाठी पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र ६ : प्राधिकरण व वडाळा भारवाहक तळातील गाळे वितरक यांच्यामध्ये करावयाचा भाडेपट्टा करारनामा मसुदा संमत करणे.

प्राधिकरणाने, बाब टिप्पणीच्या जोडपत्राप्रमाणे करारनाम्याचा मसुदा, त्यात महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महापालिका, यांजकडून करण्यात येतील त्या सूचना समाविष्ट करण्याच्या शर्तीवर मान्य करण्यात आला आणि तद्नुसार पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र ६२३ :

" असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ५० व कलम ३ चे पोटकलम [२] अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या

इतर सर्व अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, प्राधिकरण आणि वडाळा भारवाहक तळातील परिबध्द क्षेत्र नेमून दिलेल्या व्यक्ती यांच्यामध्ये करून घावयाच्या आणि बाब टिप्पणीस जोडपत्र म्हणून लावलेल्या भाडेपट्टा करारनामाचा मसुदा, त्यात महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महापालिका याजकडून करण्यात येतील त्या सूचना समाविष्ट करण्याच्या शर्तीवर मान्य करत आहे."

बाब क्र. ७ : वांद्रे-कुर्ला संकुलातील आंतरराष्ट्रीय वित्त व व्यवसाय केंद्रात परिषद केंद्र-नि-हॉटेल यांची निर्मिती करणे.

ही बाब पुढे मांडतांना महानगर आयुक्त यांनी बैठकीत असे सांगितले की, कार्यकारी समितीने या प्रश्नावर चर्चा केली होती आणि समितीने प्राधिकरणास पुढील शिफारसी केल्या होत्या :-

[१] बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करणे, [२] शासनाचे सचिव [नगररचना व पाणीपुरवठा/जलनिःसारण] नगर विकास विभाग, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महापालिका आणि महानगर आयुक्त यांच्या समितीस, कोणत्याही संभवनीय वैध त्रुटी दूर करण्यासाठी योग्य सुधारणांसहित बाब टिप्पणीस जोडपत्र-२ म्हणून जोडलेल्या जाहिरातीचा मसुदा पक्का करणे, आणि [३] उपरोक्त समितीने पक्क्या केलेल्या जाहिरातीप्रमाणे परिषद केंद्र, हॉटेल आणि सेवा केंद्राच्या प्रकल्पासाठी देकार मागविण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करणे.

कार्यकारी समितीच्या शिफारसी मान्य करून प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ६२४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे, बाब टिप्पणीत दिलेल्या तपशिलाप्रमाणे परिषद केंद्र, हॉटेल आणि सेवा केंद्र विकसित करण्या संबंधीचा प्रस्ताव मान्य करीत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ९ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, कोणत्याही वैध त्रुटी दूर करण्यासाठी योग्य सुधारणांसह बाब टिप्पणीस जोडपत्र-२ म्हणून जोडलेल्या जाहिरातीचा मसुदा पक्का करण्यासाठी, सचिव [नगर रचना व पाणीपुरवठा/जलनिःसारण]

नगर विकास विभाग, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महापालिका आणि महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची समिती नियुक्त करीत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, उपरोक्त परिच्छेदात नमूद केलेल्या समितीने पक्क्या केलेल्या जाहिराती प्रमाणे परिषद केंद्र, हॉटेल आणि सेवा केंद्र यांच्या प्रकल्पासाठी देकार मागविण्यास प्राधिकरण महानगर आयुक्तांस याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. ८ : सन १९९१-२०११ या कालावधीसाठी मुंबई महानगर प्रदेशासाठी सुधारीत प्रादेशिक योजनेचा मसूदा.

या बाबीवर विचार विमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र. ९ : पवई, मुंबई उपनगर जिल्हा येथील क्षेत्र विकास योजना - श्री. अजय मोहन व इतर यांनी दाखल केलेली १९९३ ची याचिका क्र. १४७७ आणि १९९४ ची चलन नोटीस क्र. २२६

या बाबीवर विचार विमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

बाब क्र. १० : पवई क्षेत्र विकास योजना

या बाबीवर विचार विमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

तदनंतर अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

............